पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- २०/१२/२०१९*

## पोलीस महासंचालकाच्या हस्ते 'पोलीस सुविधा केंद्र' तसेच 'ग्रंथालयाचे' उद्घाटन

- **गडचिरोली पोलीस दलाच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी व त्याचे पाल्यांकरिता नाविन्यपुर्ण उपक्रम**

जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पोलीस सुविधा केंद्र /सबसिडरी कॅन्टींनचा तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसहित पोलीस पाल्य यांचेकरिता बांधण्यात आलेल्या नविन ग्रंथालय इमारतीचा उदघाटन सोहळा मा. पोलीस महासंचालक श्री सुबोध कुमार जायसवाल यांच्या शुभहस्ते आज पार पडला. यावेळी श्रीमती रश्मी शुक्ला (अपर पोलीस महासंचालक राज्य गुप्तवार्ता विभाग म.रा.), मा. श्री. राजेंद्रसिंग (अपर पोलीस महासंचालक विशेष कृती म.रा.), मा. श्री. देवेन भारती (अपर पोलीस महासंचालक दहशतवाद विरोधी पथक म.रा.),मा. श्री. महादेव तांबडे (पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र गडचिरोली.), तसेच मा. श्री. शैलेश बलकवडे पोलीस अधीक्षक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी बांधवांना या दोन्ही उपक्रमांचा लाभ मिळणार असुन सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना स्मॉर्ट कार्ड देण्यात येणार आहेत. पोलीस कॅन्टीनमध्ये घरगुती वापराच्या सर्व वस्तु एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे .

त्याचबरोबर जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसह त्याच्या पाल्यांसाठी ग्रंथालयाची उभारणी करण्यात आली आहे. ग्रंथालयामध्ये स्पर्धा परिक्षा (MPSC,UPSC) सह पोलीस भरती, कथा कांदबरी इ. विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. याचा फायदा जिल्हाभरातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना होणार आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सा़े. यांनी या दोन्ही उपक्रमांचा लाभ जिल्हाभरातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी घ्यावा असं आवाहन या कार्यक्रमावेळी केल आहे.


गडचिरोली पोलिस
गडचिरोली पोलीस दल
"सुविधा केंद्र उद्घाटन समारंभ"
मा.श्री.एस.के.जायसवाल,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
यांचे शुभ हस्ते